# जागतिक सायकल दिनी मेट्रो रेल महामंडळाचा प्रदूषणमुक्तीचा संदेश

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) - मुंबई मेट्रो रेल महामंडळाने (एमएमआरसीएल) जागतिक सायकल दिनाच्या निमित्ताने सोमवारी सायकल रॅलीचे आयोजन करून मुंबईकरांना प्रदूषणमुक्तीचा संदेश दिला. विधान भवन मेट्रो स्थानक ते आझाद मैदान येथील मेट्रो स्थानकापर्यंत ही रॅली आयोजित केली गेली.

पर्यावरणदिनाचे औचित्य साधून मेट्रो रेल महामंडळाने पर्यावरणाविषयी जागृती करण्याचा संदेश दिला. इंधनाचा कमी वापर करीत वाहतूक, सुरक्षितता आणि प्रदूषणमुक्त प्रवास हे या रॅलीचे उद्दिष्ट होते. एमएमआरसीएलचे कार्यकारी संचालक आर. रमणा यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या रॅलीत वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते.